ISSN: 2278-5914

## सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा

# SANSHODHAN

## Research Journal

Issue IX

# संशोधन

अंक नववा




प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# SANSHODHAN — संशोधन

Research Journal — रिसर्च जर्नल

Issue : IX September
अंक ९ वा 2019

ISSN 2278-5914

---

* **Publisher :** Prof. Atmaram Thorat
  President,
  Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara.

* **Printer :** Siddhivinayak Enterprises
  322, Yadogopal Peth, Satara
  Mob.: 9420771326

* **Publication Date :** 29 September 2019

* **Donated Value :** Rs.200/-



(All rights reserved under the Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara )
(The views expressed by the authors in 'Sanshodhan' Reaserch journal in this issue are there own. The editor and publisher are not responsible for them)

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | वीर सिंदूर लक्ष्मण महाराष्ट्रातील एक दुर्लक्षित क्रांतीकारक | प्रा.डॉ.गौतम गणपती कार्टकर | ७२ |
| १४ | यशवंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीमध्ये विठामातेचे योगदान | प्रा.डॉ.उर्मिला नरसिंगराव क्षीरसागर | ७९ |
| १५ | भारतीय संविधानातील स्त्रियांचे अधिकार एक चिकित्सक अभ्यास | प्रा.डॉ.एल.डी.आंदे | ८४ |
| १६ | वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे सामाजिक प्रबोधनातील योगदान | प्रा.डॉ.दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे | ९१ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व व विदर्भातील दलित स्त्री चळवळ (विशेष संदर्भ : अंबादेवी सत्याग्रह) | डॉ.अंबादास मंजुळकर | ९६ |
| १८ | Documentation of Women Folk Songs of Karnataka | Dr. Nalini Avinash Waghmare | १०२ |
| १९ | श्रध्दानंद छात्रालय : शैक्षणिक सामाजिक क्रांतीचे प्रतीक | प्रा.डॉ.कल्पना राजीव मोहिते | १०८ |
| २० | स्त्रीप्रगतीच्या वाटचालीतील स्थित्यंतरे | प्रा.डि.के.रसाळ<br>प्रा.के.एस.शिंदे | ११५ |
| २१ | स्त्री–मुक्ती सुधारक : पंडिता रमाबाई | डॉ.संगीता संपत पाटील | ११९ |
| २२ | महाराष्ट्राच्या स्त्री उद्धारक पंडीता रमाबाई | प्रा. विद्या युवराज कापसे | १२५ |
| २३ | महाराष्ट्राच्या जडणघडणीमधील सिंधुताई सपकाळ यांचे योगदान | प्रा.डॉ.सुरेश मारूती चव्हाण | १२९ |
| २४. | प्रतिसरकारमधील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान | प्रा.डॉ. ए.एस.टिके | १३३ |
| २५ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान | प्रा.डॉ.संतोष तुकाराम कदम | १३६ |
| २६ | कॉम्रेड हौसाबाई पाटील यांचे कार्यकर्तृत्व | प्रा.रोहिणी रामचंद्र शेवाळे | १४० |

# २३.महाराष्ट्राच्या जडणघडणीमधील सिंधुताई सपकाळ यांचे योगदान

**प्रा.डॉ.सुरेश मारूती चव्हाण**
**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय**
**गडहिंग्लज, जि.कोल्हापूर**

**प्रस्तावना :** भारताच्या जडणघडणीत महाराष्ट्राचे तर महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक समाज सुधारकांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीवर प्रकाश टाकला असता सामाजिक समतेच्या व मानवतेच्या अनुषंगाने सिंधुताई सपकाळ यांचे योगदान वरच्या क्रमांकाचे दिसून येते. भारताच्या पारतंत्र्याच्या काळापासून समानतेवर आधारलेल्या समाज निर्मितीसाठी विविध सुधारणा चळवळी सुरू करण्याचा प्रयत्न झाला. असे प्रयत्न हे व्यक्तीगत व सामुहीक अशा दोन्हीही पातळीवर झाल्याचे दिसून येतात. जसे की, ब्राम्होसमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज, थिऑसॉपीकल सोसायटी, प्रार्थना समाज, रामकृष्ण परमहंस, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे यांची शैक्षणिक सुधारणा चळवळ, स्त्रीसुधारणा चळवळ, अस्पृश्य निवारण, विद्यार्थी विकास चळवळ, कामगार विकास चळवळ, अशा असंख्य चळवळी या सामाजीक सुधारणा चळवळींची बोलकी उदाहरणे आहेत. गेली दोन – तीन दशकामध्ये ज्या समाजसुधारणा चळवळींनी सामजकार्याचा महान आदर्श घालून दिला. त्यामध्ये थोर समाजसेविका सौ.सिंधुताई सपकाळ यांच्या सामाजिक चळवळीतील कार्याचा विशेष उल्लेख करावा लागतो. वैयक्तिक जीवनामध्ये अनाथपणाचे असंख्य चटके सहन कराव्या लागलेल्या सिंधुताईंनी अनाथांना आश्रय देण्यासाठी अनाथाश्रमांच्या माध्यमातून मानवतेवर आधारलेली एक आव्हानात्मक चळवळ उभी केली आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये त्यांच्या महाराष्ट्रातील जडण घडणीमधील योगदानावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**सिंधुताई सपकाळ यांचे प्रारंभीचे जीवन :** ताईंचा जन्म १४ नोव्हेबंर १९४७ रोजी विर्दभातल्या वर्धा जिल्ह्यातील नवरगांव या गावी झाला. त्यांचे वडील गुरे वळण्याचे काम करत असत. गाव अतिशय लहान व मागासलेले असल्याने सुधारणांपासून दूरच होते. ताईच्या शिक्षणास वडीलांचा पाठिंबा तर आईचा विरोध असल्याने त्यांना केवळ इयता चौथी पर्यंतच शिकता आले. वयाच्या ९ व्या वर्षी म्हणेजच बालवयातच त्यांचा विवाह २० वर्षीनी मोठे असणाऱ्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी झाला. १८ व्या वर्षापर्यंत त्यांची तीन बाळंतपणे झाली.

पण चौथे बाळंतपण त्यांच्या जीवनालाच कलाटणी देणारे ठरले. दरम्यानच्या काळातच त्यांनी शेणवाल्या मजूरांना न्याय मिळावा म्हणून शेणाचं आंदोलन केले व त्यात यशही मिळवले. पण या घटनेमध्ये दमडाजी असतकर हा जमिनदार दुखावला गेला आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. नाराज जमिनदाराने माईच्या पोटातील मुल आपलचं असल्याचा अपप्रचार सुरू करून तिच्या चारित्र्याचे धिंडवडे काढले. परिणामी नवऱ्याच्या मनात शंका आल्याने त्याने सिंधुताईस बेदम मारहाण करून घराच्या बाहेर काढले. त्यांना माहेरच्यांनीही मदत नाकारल्याने शेवटी भीक मागून जगण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्यावर आली. अशा बिकट अवस्थेत त्या म्हणायच्या

'' ये ऊन किती कडक तापते ग बाई
अंगाची फुटते लाही.
दोन दिसाचा शिळा तुकडा वाढा पण
दार नका लावु ,पुन्हा येणार नाही.''

या काळात वाट मिळेल तिकडे त्या चालत राहिल्या. शेवटी त्यांना स्मशानाचा आश्रय घ्यावा लागला. एका भंयकर रात्री त्या स्मशानात पडून होत्या भुकेचा आगडोंब उसळला होता. एक मृतदेह आला. अत्यंसंस्काराच मडक फोडून जमाव निघून गेला. खिन्न काळोख दाटला होता. चित्ता धगधगत होती. मृत माणूस जळत होता. सिंधुताईच्या पोटातील भूख इतकी पेटली होती की लोकांनी हातावर दिलेले पीठ मडक्यातल्या पाण्यात कालवून चित्तेवर भाजलेली भाकरी तसीच खाल्ली. त्यातून त्या पुढे चिखलदऱ्यास आल्यावर मजूरांच्या समवेत त्यांच्या मुलांचा सांभाळ करू लागल्या. असेच फिरत-फिरत पुण्यास आल्या. रस्त्यावर दिपक नावाचा मुलागा रडत बसला होता. काय करणार बिचारा अनाथ होता. सिंधुताईनी त्याच्यासाठी अपार प्रयत्न केले. पण मदतीसाठी कुणीच पुढ येईना तेंव्हा माईनी त्याला आपल्याच पदराखाली घेवून समाजकार्याचा प्रारंभ केला.आणि केवळ पाच दशकात त्या अख्ख्या महाराष्ट्राच्याच माई बनल्या.

**सिंधुताई सपकाळ यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतली योगदान :** राष्ट्रबांधणीच्या निमिताने ज्या समाजसुधारणा चळवळींनी मोठे योगदान दिले त्यात सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. आपल्या वाटयास आलेलं दुर्दैवी जीवन इतरांच्या वाटयाला येवू नये म्हणूनच त्यांनी मिळेल त्याला आधार देवून समाजकार्याचा वसा घेतला. पुण्यामध्ये रस्त्यावर रडणाऱ्या अवस्थेत सापडलेला दिपक हाच त्यांचा पहिला वारस पुत्र ठरला. अशा असंख्य वारसपुत्रांना सिंधूताई मायेंच प्रेम देताना दिसतात. जगातील सर्वात पहिल्या आनाथाश्रमाची स्थापना अमेरिकेत झाल्याचा उल्लेख मिळतो. त्यास ऑर्फनोथ्रोफिया संबोधले आहे. तर आधुनिक काळात ही अमेरिकेतच १९४० मध्ये जॉर्ज व्हाईटफिल्ड यांनी बेथिस्दा ऑर्फनेज्ची स्थापना केल्याचे दिसून येते. भारताचा विचार करता डिप्रेस्ड क्लास मिशन ,नॅशनल

सोशल कॉन्फरन्स, ब्राहमो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज यांनी अनाथांच्या स्वाभिमान रक्षणासाठी भरघोस कार्य केल्याचे दिसते. त्याच धरतीवर गेल्या पाच दशकात सिंधूताईनी अनाथाश्रमाच्या माध्यातून समाजसेवेला वाहून घेतलेले दिसते. त्यांच्या अथक परिश्रमातून आज त्यांच्या अनाथाश्रमांमध्ये असंख्य अनाथ बालके जीवनाचा आनंद घेत आहेत. सिंधूताईच्या अपार समाजसेवेची चालती बोलती उदाहरणे म्हणजेच त्यांनी स्थापन केलेल्या संस्था होय. यामध्ये प्रामुख्याने सन्मती बालनिकेतन संस्था हडपसर पुणे, अभिमान बाल भवन माळेगाव वर्धा, गंगाधर बाळ छात्रालय, गुहा अहमदनगर, ममता बालसदन कुंभारवळण, पुणे, गोपिका वनौषधी प्रकल्प वाढोणा वर्धा, गोपिका गायरक्षण केंद्र माळेगाव जि.वर्धा यांचा समावेश होतो.

सौ.सिंधूताईच्या या सर्व संस्था महाराष्ट्रात, देशभर व देशाबाहेर दिलेल्या भाषणातून मिळणारे मानधन, शासनाची तूटपूंजी मदत यातूनच समर्थपणे चालवल्या जातात. त्यासाठी माई नेहमीच भीक मागतात, पदर पसरतात, आवाहन करतात. पण हे सर्व स्वतः साठी नसून सर्वसामान्यांच्या स्वावलंबनासाठी असते हे विशेष होय. अनाथ मुलांच्या दोन घासासाठी दिवसरात्र पायाला चाके बांधून वणवण फिरणारी स्त्री म्हणून सध्यातरी सिंधुताईचाच उल्लेख करावा लागतो. त्यांच्या अनाथश्रमातील प्रत्येक व्यक्ती त्यांचा मुलगा किंवा मुलगी म्हणूनच जीवन जगताना दिसतात. आज सिंधुताईना १५०० मुले आहेत. १०० मुली आहेत यात दोन दिवसाच्या मुलापांसून ७२ वर्षाच्या वृध्दापर्यंत सर्वांचा समावेश होतो. याशिवाय ४०० सुना व २०० जावई आहेत. आज यातील बरिचशी मुलं शिकून सवरून स्वतःच्या पायावर उभी आहेत. कोण डॉक्टर आहे, कोण इंजिनिअर आहे, तर कोण वकील हे सांगताना माईना भरभरून येते.

सिंधुताई सपकाळ यांनी केलेल्या कार्याची पोहच पावती म्हणून त्यांना देश विदेशातील सुमारे ५०० पुरस्कारांनी सन्मानीत केलेले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्कारांची सर्व रक्कम त्या अनाथाश्रमासाठीच वापरतात. खरं तर अलीकडे वैयक्तीक फायद्यासाठी समाजकार्याचा वापर करणाऱ्या या स्वार्थी काळात वैयक्तीक फायदाही समाज कार्यासाठी वापरणाऱ्या थोर समाजसेविका मध्ये सिंधुताईचा विषेश उल्लेख करावा लागतो. याशिवाय त्यांच्या जीवनावर 'मी सिंधुताई सपकाळ' हा मराठी चित्रपट ही प्रदर्षित झाला आहे. विविध वाहिन्यांनी घेतलेल्या ग्रेट मुलाखतीतून त्यांचा यशस्वी जीवनपट समाजासमोर आणण्यासाठी सदैव झुंबड उडालेली असते. देशभरातील विविध स्तरातून त्यांच्या कार्याचा गौरव होताना दिसतो. हे सर्व त्यांच्या अंतःकरणातून निरपेक्ष भावनेनं केलेल्या उदात्त समाजकार्याचंच फलित आहे. त्यामुळे आज अनाथाच्या संदर्भातील समाजसुधारणा चळवळीचा अभ्यास करताना सिंधुताईच्या कार्याचा आढावा घेतल्याशिवाय अनाथा आश्रम ही संकल्पनाच समजून घेता येणार नाही

**सारांश :** देशाच्या किंवा राज्याच्या प्रदीर्घ जडणघडणीत निसर्गात घडणाऱ्या वेगवेगळ्या कारणांनी अनाथ निराश्रीत, व्याधीग्रस्त, वंचित अशा घटकांचा माणूस म्हणून जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतलेला दिसतो तोच हक्क त्यांना परत मिळवून देण्यासाठी, माणूस म्हणून जीवन जगता यावे म्हणून त्यांच्यावर अनाथाश्रमाच्या माध्यमातून मायेची पाखर घालण्याचे कार्य सिंधुताई सपकाळ यांनी केले आहे. सर्व काही उध्वस्थ झालेले आसतानाही दुर्दैवाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सिंधुताईंनी समाजकार्यात स्वतःला झोकून देवून मारलेली उत्तुंग भरारी नवी प्रेरणा देणारी आहे. त्यांच्या या कार्यामुळेच त्या अखंड महाराष्ट्रातील अनाथांच्या आई तथा महाराष्ट्राची माई म्हणूनच परिचित आहेत. गाईला माय मानणाऱ्या सिंधुताईनी मानसांना तर मानसासारख वागवलं पण जनावरांनाही माणसात आणण्याचं उदात्त कार्य केले. आपल्या अनाथाश्रमातील मुलं स्वतःच्या पायावर उभी राहिल्याचे सांगतांना त्यांच्या डोळ्यात पाण्याच्या धारा येतात. पण त्या धारा दुःखाच्या नसून आनंदाच्या आहेत हेही सांगायाला त्या विसरत नाहीत वैयक्तिक फायदायासाठी समाजकार्याचा वापर करणाऱ्या स्वार्थी जगात वैयक्तिक मिळालेल्या सुमारे ५०० पुरस्कारांची लाखो-करोडो रूपयांची संपत्ती त्यांनी अनाथांसाठीच वापरलेली आहे. यावरून त्यांची महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडण चळवळीतील योगदानाची साक्ष पटते.

**संदर्भ :**

१. सौ.सिंधुताई यांच्या विविध संस्थांचे अहवाल
२. WWW. Sindhutaisapkal.com
३. एच.एस.भोगण, 'द लकीयस्ट ऑर्फन्स : अ हिस्ट्री ऑफ द हिब्रु ऑर्फन आलान्स ऑफ न्यूऑर्क', १९९१
४. डी.बी. महाजन, 'आमची माई' आदित्य प्रकाशन, औरंगाबाद २०१५ पा.नं. २६,२७
५. ममता बालसदन विषेशांक २०१४
६. दै.तरूण भारत, १२ जानेवारी २००२
७. सन्मती बालसदन विषेशांक तथा अहवाल २०१२
८. सौ.सिंधुताईचे वारस पुत्र दिपक गायकवाड यांची मुलाखत २०/०९/२०१५
९. मानसपुत्र प्रा.डॉ.श्याम रणदिवे यांची मुलाखत दि.११/०८/२०१८
१०. डॉ.व्ही.आर.पाटील (संपादक) 'महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि त्यांचे बदलते स्वरूप या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राची निवडक शोध पुस्तीका रान २०१६
११. सिंधुताई सपकाळ, 'मी वनवासी' (आत्मचरित्र ), रिया पब्लिकेशन,कोल्हापूर २०१३ पा.नं. २२,२३



प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर